**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. १३५/२०२२** **निशाणी क्र. ५६/क लगत**

**<u>वि.प.तर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची जबाणी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | रतन भुजिंगा मधाळे |
| वय | - | ३९ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी-ग्रामपंचायत कार्यालय माणकापूर. |
| राहणार | - | माणकापूर, ता.निपाणी, जि.बेळगांव |

---

**<u>सरतपास मार्फत वि.प.तर्फे विधीज्ञ श्रीमती पाटील.</u>**

१. मी माणकापूर ग्रामपंचायत कार्यालय येथे सन २०२२ पासून लिपीक म्हणून कार्यरत आहे व त्यापुर्वी मी शिपाई म्हणून तेथेच कार्यरत होतो. माणकापूर ग्रामपंचायतीच्या नोंदी माझ्या देखरेखीखाली ज्या रजिस्टरमध्ये होतात ते मुळ रजिस्टर मी आज सोबत आणले आहे. त्या रजिस्टरमध्ये गावातील सर्व नोंदी आहेत त्यामध्ये दुधडेअरी, पावरलुम, किराणा इ. दुकानांची नोंद असते. मला कन्नड भाषा येते. आता मला दाखविण्यात आलेला नि. २८ सोबतचा दुधडेअरी परवाना विठ्ठल मनग्याणी कटेकर यांचा आहे. आता मला दाखविण्यात आलेला परवानाचा दाखला तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो नि.क्र. ४८ वर आहे. नि.क्र. ४८ च्या दाखल्याची नोंद आमच्या मुळ रजिस्टरला आहे. मुळ रजिस्टर सोबत आणले आहे त्यावरून नि.क्र. ४८ चा दाखला दिला आहे. मी माणकापूर येथे जन्मापासून राहत आहे. दुध डेअरी किंवा कोणताही परवाना बाळू गावडे यांचे नावाने नाही.

**<u>उलटतपास अर्जदार मार्फत विधीज्ञ श्री.चुडमुंगे.</u>**

२. मला माणकापूर गावातील लोक जे व्यवसाय करतात त्यांची माहिती आहे. मी दुध डेअरीमध्ये गेलेलो आहे. हे मला माहिती नाही की, बाळू गावडे हा त्या डेअरीमध्ये काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, विठ्ठल मनग्याणी कटेकर यांचा बाळू गावडे हा नातलग आहे. हे म्हणणे खरे आहे की, विठ्ठल मनग्याणी कटेकर हा बाळू गावडे यांचा

मामा आहे. हे म्हणणे खरे आहे की, बाळू गावडे हा लहानपणापासून विठ्ठल मनग्याणी कटेकर यांचेसोबत माणकापूर मध्ये राहतो. आमच्याकडे डेअरीमध्ये किती लोक काम करतात, प्रत्यक्ष कोण काम करतो याची माहिती आमचेकडे नाही. मला मराठीही वाचता येते. साक्षीदाराला नि.क्र. ३५ चा दस्त दाखविला. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ३५ च्या दाखल्यामध्ये बाळू गावडे हे विठ्ठल कटेकरी यांचेकडे डेअरीवरती कामाला आहे असे नमुद आहे. हे मला माहिती नाही की, विठ्ठल कटेकरी यांची शेती हा बाळू गावडे सांभाळतो. हे मला माहिती नाही की, वि.प. हा अर्जदारासोबत लग्न झालेपासून माणकापूर येथे राहतो व त्याचे आईवडील कारदगा या गावी राहतात. हे मला माहिती नाही की, विठ्ठल कटेकर यांची दुध डेअरी बाळू गावडे हा पाहतो. हे म्हणणे खरे नाही की, बाळू गावडे हा विठ्ठल कटेकर यांची दुध डेअरी पाहतो हे माहिती असूनही मी खोटे सांगत आहे. हे मला माहिती नाही की, दुध डेअरी जरी विठ्ठल कटेकरी यांची असली तरी सर्व व्यवहार बाळू गावडे पाहतो. हे मला माहिती नाही की, विठ्ठल कटेकरी हा शेतकरी असल्यामुळे तो दुध डेअरी पाहत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ४८ चा परवाना हा दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२२ पर्यंतचा आहे. साक्षीदार स्वताः सांगतो परवाना वर्षाला नुतनीकरण केला जातो.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

साक्षीदारास त्याची न्यायालयासमक्ष नोंदविलेली साक्ष वाचून दाखविली व त्याने ती त्याच्या सांगण्याप्रमाणे बरोबर नोंदविल्याचे मान्य केले.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण- इचलकरंजी
दिनांक- १८/०४/२०२६.

(**डी.बी.साठे**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. २,
इचलकरंजी.